आपत्ती सौम्यीकरण अंतर्गत नॉन-स्ट्रक्चरल कामांना प्रशासकीय मान्यता देणेबाबत.
जालना पाटबंधारे विभाग, जालना यांचा गल्हाटी नदी, गोदावरी नदी, काल नदी, पार नदी, सुखाना नदी व इतर उपनद्या (जि. जालना) यांच्या रेड-लाईन, ब्ल्यु-लाईन सर्वेक्षणाचा प्रस्ताव.

महाराष्ट्र शासन
मदत व पुनर्वसन विभाग,
(आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन)
शासन निर्णय क्रमांक :- आव्यप्र-२०२६/प्र.क्र.३२८/आपत्ती-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ३१ ऑगस्ट, २०२६.

वाचा :-

१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम (सुधारित) - २०२५.
२) राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,नवी दिल्ली यांच्या दि.०६.०३.२०२३ रोजीच्या मार्गदर्शक सूचना.
३) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.आव्यप्र-२०२४/प्र.क्र.०१/आव्यप्र-२, दि.१० जानेवारी, २०२४ व दि.१३.१२.२०२४ रोजीचे पूरक पत्र.
४) जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना यांचे दि.२०.०६.२०२५ रोजीचे पत्र.
५) दि.१३.०८.२०२५, दि.२६.११.२०२५ व दि.११.०३.२०२६ रोजीच्या प्रकल्प मूल्यमापन समितीच्या बैठकीचे इतीवृत्त.
६) दि.०१.०४.२०२६ रोजीच्या राज्य कार्यकारी समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.
७) दि.२६.११.२०२५, दि.०३.१२.२०२५ व दि.०२.०४.२०२६ रोजीच्या तांत्रिक मूल्यमापन समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.
८) दि.२३.०६.२०२६ रोजीच्या राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या बैठकीत झालेला निर्णय.

प्रस्तावना:-

केंद्र व राज्य शासनाने घोषित केलेल्या आपत्तींचे सौम्यीकरण करण्यासाठी १५ व्या वित्त आयोगाने महाराष्ट्र राज्यासाठी राज्य आपत्ती सौम्यीकरण निधी अंतर्गत (State Disaster Mitigation Fund, SDMF) सन २०२१-२२ ते सन २०२५-२६ अशा ५ वर्षांकरीता निधी मंजूर केलेला आहे. सदर निधीच्या वापराबाबत आपत्ती व्यवस्थापन विभाग, केंद्रीय गृह मंत्रालय, भारत सरकार यांनी दि. १४ जानेवारी २०२२ रोजी व राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी दि. ६ मार्च २०२३ रोजी मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत.

२.	महाराष्ट्र राज्य आपत्ती सौम्यीकरणांतर्गत राज्यातील जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांमार्फत विविध अ-संरचनात्मक (Non - Structural) सौम्यीकरणांच्या कामांचे प्रस्ताव शासनास सादर केलेले आहेत. उपरोक्त संदर्भ क्र. ४,५,६ नुसार सदर प्रस्तावांना प्रकल्प मूल्यमापन समिती (PAC), तांत्रिक मुल्यमापन समिती (TAC) व राज्य कार्यकारी समिती (SEC) यांची मान्यता प्राप्त झाली असुन सदर मान्यतेच्या अनुषंगाने प्रस्ताव राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (SDMA) च्या दि.२३.०६.२०२६ रोजीच्या बैठकीत मान्यतेसाठी ठेवण्यात आलेले होते. आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (SDMA) च्या बैठकीत मान्यता देण्याबाबत झालेला निर्णयाच्या अनुषंगाने सदर आपत्ती सौम्यीकरणांच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

१५ व्या वित्त आयोगाने मंजूर केलेल्या राज्य आपत्ती सौम्यीकरण निधीमधून राज्यातील आपत्ती सौम्यीकरणांतर्गत जालना पाटबंधारे विभाग, जालना यांच्या प्रस्तावातील नमुद खालील कामांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या रकमेनुसार नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

विभागाचे नाव - जालना पाटबंधारे विभाग, जालना.

अ.क्र.	कामाचे नाव पूर प्रतिबंधक कामे	अंदाजपत्रकीय रक्कम (रु. कोटीमध्ये)	निधी स्त्रोत व वर्ष
१.	जालना पाटबंधारे विभाग, जालना यांचा गल्हाटी नदी, गोदावरी नदी, काल नदी, पार नदी, सुखाना नदी व इतर उपनद्या (२१ कामे)	४.६७	२०२६-२७

अटी व शर्ती :

१) या आदेशाद्वारे मंजूर केलेल्या कामांसाठी तांत्रिक मंजूरी (Technical Sanction) देणा-या सक्षम प्राधिका-याची संनियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

२) सदरचे काम करताना राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या दि.०६.०३.२०२३ रोजीच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.

३) संदर्भीय दि.१०.०१.२०२४ व दि.१३.१२.२०२४ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आपत्ती सौम्यीकरण कामाच्या मानक कार्यपध्दतीचे (S.O.P.) पालन करणे बंधनकारक राहील.

४) राज्य कार्यकारी समितीने दि.०१.०४.२०२६ रोजीच्या बैठकीमध्ये तसेच राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या दि. २३.०६.२०२६ रोजीच्या बैठकीमध्ये दिलेले निर्णय व निर्देश यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

५) नदी / नाले यांच्याशी संबंधीत रेड-लाईन - ब्लू-लाईन सर्वेक्षण/खोलीकरण/ रुंदीकरण/ ट्रेनिंग/पूर संरक्षक भिंत व अन्य तत्सम कामे जलसंपदा विभागाव्यतिरीक्त अन्य विभागामार्फत राबविण्यात येत असल्यास संबंधित कार्यान्वयीन विभागाने प्रस्तुत कामांच्याबाबत असलेल्या जलसंपदा विभागाच्या प्रचलित धोरणानुसार विहीत केलेल्या अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.

६) सदरचे आदेश प्राप्त झाल्यावर संनियंत्रण अधिका-यांनी तांत्रिक मान्यता, अंदाजपत्रक व डी.पी.आर. ची एक प्रत संबंधित जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणास सादर करावी.

७) प्रस्तुत कामांची निविदा प्रक्रिया राबविण्यापासून ते कामे पूर्ण होईपर्यंतच्या सर्व टप्प्यांवर सबंधित कार्यान्वयीन विभागास लागू असलेले सर्व प्रचलित नियम, शासन निर्णय, परिपत्रके व मार्गदर्शक सूचना इत्यादींची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे बंधनकारक राहिल.

८) दि. १०.०१.२०२४ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आपत्ती सौम्यीकरण कामाच्या मानक कार्यपध्दतीमधील (S.O.P.) परि. २.१२ मधील तरतूदींनुसार कार्यारंभ आदेश देण्यापूर्वी निविदा प्रक्रिया पूर्ण करुन न्यूनतम देकाराची निविदा (L-१) व कामाचा दर निश्चितीबाबतची शिफारस या विभागाकडे मान्यतेसाठी सादर करावी.

९) प्रस्तुत कामांना नव्याने भूसंपादन करण्याची आवश्यकता भासणार नाही याची दक्षता घ्यावी.

१०) कार्यारंभ आदेश देण्यापूर्वी तांत्रिक मूल्यमापन समितीने सुचविलेल्या सुधारणांची/त्रुटींची पूर्तता करणे तसेच ज्या कामांची तांत्रीक मंजूरी (Technical Sanction) सादर केलेले नाही त्या कामांची तांत्रीक मंजूरी ही या विभागास व सबंधीत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांना सादर करणे बंधनकारक राहील.

११) कामकरताना DGPS (Differential Global Positioning System) प्रणालीचा वापर करणे बंधनकारक राहील.

१२) प्रशासकीय मान्यता ज्या कामासाठी दिली आहे त्याच कामासाठी मंजूर निधी खर्च करावा व त्या निधीच्या मर्यादेबाहेर अतिरिक्त खर्च होणार नाही याची दक्षता घ्यावी.

१३) सदर कामे विहित कालमर्यादेत पूर्ण करण्याची जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

१४) "संनियंत्रण अधिकारी" यांनी आढावा घेऊन दरमहा ५ तारखेपूर्वी कामाचा भौतिक व आर्थिक प्रगती अहवाल विहीत नमुन्यात या विभागास तसेच एक प्रत संबंधित जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणास सादर करावी.

१५) कामांच्या निधी/देयक मागणीचा प्रस्ताव कार्यान्वयीन यंत्रणेच्या सक्षम प्राधिका-याच्या स्तरावर तपासणीअंती विहीत प्रपत्रात शिफारशीसह मान्यतेसाठी या विभागास सादर करावा.

१६) कामांच्या खर्चाबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास व संबंधित जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणास वेळोवेळी सादर करण्यात यावे.

१७) कामे पूर्ण झाल्यानंतर त्वरीत पूर्णत्वाचे प्रमाणपत्र शासनास व संबंधित जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणास सादर करावे.

३. सदरचा शासन निर्णय प्रकल्प मूल्यमापन समिती (PAC), तांत्रिक मुल्यमापन समिती (TAC) व राज्य कार्यकारी समिती (SEC) यांच्या बैठकीत झालेला निर्णय व राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (SDMA) च्या दि.२३.०६.२०२६ रोजीच्या बैठकीत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने निर्गमित होणा-या इतीवृत्ताच्या अधीन राहुन व आंतरवित्तीय सल्लागार तथा सहसचिव, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे..

४. सदर कामे राज्य आपत्ती सौम्यीकरण निधीअंतर्गत (SDMF) सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात मंजूर असलेल्या निधीतून करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

५. या कामी होणारा खर्च मागणी सी-६, २२४५, नैसर्गीक आपत्तींच्या निवारणासाठी सहाय्य, ०७ आपत्ती व्यवस्थापन, १०१, आपत्ती सौम्यीकरण (९१) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च (९१) (०१) राज्य आपत्ती सौम्यीकरण निधी (वित्त आयोग) (अनिवार्य) (२२४५ ४२५९) ३१- सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली त्या त्या वेळी अर्थसंकल्पीत करण्यात आलेल्या निधीतून भागविण्यात येईल.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८३११६५१२८६३४१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANJEEV ANANT RANE

Digitally signed by SANJEEV ANANT RANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Dept,
2.5.4.20=65127096B801093AD7FB61EB80E8615C3832B44354B8038DD89289E85848D9A9, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=8AC7DCEA96B950440D554DF2C7F54D6021A8C9AC921A09CC853B5817534BD427, cn=SANJEEV ANANT RANE
Date: 2026.08.31 16:52:33 +05'30'

(संजीव राणे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहीतीस्तव :

१) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

२) मा. मंत्री,आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई.

३) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, मंत्रालय, मुंबई.

४) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव, ऊर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) अपर मुख्य सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) विभागीय आयुक्त, नागपूर.
९) संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) वित्तीय सल्लागार तथा सह सचिव, आ. व्य., मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) जालना पाटबंधारे विभाग, जालना.

प्रत: माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.

१) जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना.
२) महालेखापाल (महाराष्ट्र-१) मुंबई/नागपूर.
३) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
४) जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा - जालना.
५) अवर सचिव, अर्थसंकल्प कार्यासन, आ.व्य.म.व पु., मंत्रालय, मुंबई.
६) निवड नस्ती/ आव्यप्र-२.